10 SHARES

सकाळ

डिसेंबर २०२५ । किंमत ६० रुपये

MONEY

रात्रीस खेळ चाले,
या 'गूढ' बाजाराचा...

डिजिटल फसवणूक
संपता संपेना...

अमेरिका
पतनाच्या
उंबरठ्यावर..?

निद्रिस्त सोन्याला
कामाला लावा!

बाजार जोरात, पोर्टफोलिओ कोमात?

नाताळची घंटा आणि
बाजारात तेजीच्या लाटा

नाताळची घंटा आणि बाजारात तेजीच्या लाटा...

कव्हरस्टोरी

सुहास राजदेरकर
suhas.rajderkar@gmail.com

अमेरिकी फेडरल रिझर्व्हकडून दरकपातीची अपेक्षा आणि परदेशी निधीच्या प्रवाहाचा वाढता ओघ या आशेवर जागतिक शेअर बाजारांमध्ये तेजीचा कल दिसून आला. त्याचे प्रतिबिंब आपल्याकडील शेअर बाजारातही उमटले. भारतीय शेअर बाजारांनीही तेजीची घोडदौड कायम राखत नवे उच्चांक प्रस्थापित केले. उच्चांकी पातळीवर काही प्रमाणात नफेखोरीही दिसून आली. आता डिसेंबरमध्ये नाताळचा सण, सांता क्लॉज, प्रसिद्ध घंटा (जिंगल बेल) यांचे वेध लागलेले असताना, दुसरीकडे शेअर बाजारात तेजीच्या लाटा उसळताना दिसत आहेत. दररोज बाजार वर-खाली का होत आहे, हे पाहण्यात वेळ घालवण्यापेक्षा शेअर बाजाराला त्याचे काम करू द्या, तो दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी नेहमी उत्तमच काम करतो.

अथर्व : अरे सोहम, तू सांगितलेले शेअर्स बऱ्यापैकी खालीच आहेत रे... काय करायचे?

सोहम : अरे हो ना बाबा... माझीसुद्धा पंचाईतच झाली आहे. कारण प्रिया, माझी बायको म्हणत आहे, की डिसेंबरमध्ये नाताळची सुट्टी आहे, मस्त बाहेर जाऊ कोठेतरी... पण हातात पैसेच नाहीत आणि मी हे शेअर्स लगेच वाढतील म्हणून विकणार होतो.... पण आता...

अथर्व : आपण सरांना भेटूया का? तेच काहीतरी मार्ग सांगतील...

सोहम : हो, चालेल... आताच येऊ का ते विचारतो...

मी : या, या, ये रे सोहम... आज काय इतके अर्जंट काम?

सोहम : मुद्द्यावरच येतो, सर, शेअर बाजाराचे काय चालले आहे सध्या?

मी : का? काय झाले? छान चालले आहे की...

अथर्व : कोठे हो सर... ट्रम्प यांच्या धोरणांमुळे बाजार काही वर यायला तयार नाही... त्यापेक्षा बँकेत पैसे ठेवले असते तर बरे झाले असते... या सोहमने सांगितले आणि...

मी : आणि? डेरिव्हेटिव्हजमध्ये गेलात की काय?

सोहम : नाही, नाही... पण आम्ही घेतलेले शेअर्स गेले पाच महिने झाले वाढतच नाहीत... उलट खाली गेले आहेत...

मी : अच्छा, बरं, अथर्व, मला सांग, बँकेत ठेवले असते असे म्हणालास... बँकेत तुम्हाला वर्षाला किती व्याज मिळाले असते?

अथर्व : साधारण ७ ते ८ टक्के...

मी : पण मग, शेअर बाजाराने मागील ११ महिन्यांतच तुम्हाला तेरादहाच परतावा दिला आहे की... मग समस्या काय आहे? आणि तुम्ही घेतलेले शेअर्स पाच महिन्यांत वाढतीलच, हे तुम्हाला कोणी सांगितले? तुम्ही घेतलेले शेअर्स वाढत नाहीत म्हणून बाजार खराब आहे असे होत नाही ना...

(दोघेही शांत, निरुत्तर...)

सोहम : खरे आहे सर... पण, शेअर बाजार आणखीन केव्हा वर येईल, असे वाटते?

मी : याचा अचूक दिवस कोणी सांगू शकत नाही. पण दिशा सांगता येते आणि सध्याचा आढावा घेतला तर चिन्हे सकारात्मक आहेत.

बाजार का अस्थिर होता?

शेअर बाजाराने मागील पाच वर्षांमध्ये साधारण २० टक्के परतावा दिल्यामुळे शेअर बाजार गुंतवणूकदारांच्या २०२५ वर्षाकडून सुद्धा अपेक्षा उंचावल्यास नवल नव्हते. त्यातून सोने आणि चांदी यांनी या वर्षामध्ये डोळे दीपवणारा (५० टक्के +) परतावा दिल्यामुळे अनेक गुंतवणूकदारांना शेअर बाजाराकडूनसुद्धा तीच अपेक्षा होती. विशेषतः सोन्यामध्ये पैसे न गुंतवता ज्यांनी शेअर बाजारात किंवा इक्विटी म्युच्युअल फंड योजनांमध्ये गुंतवणूक केली होती, ते काहीसे नाराज झाले. परंतु, प्रत्येक बॉल जसा 'सिक्सर' नसतो, तसेच प्रत्येक वर्षामध्ये शेअर बाजार किंवा सोने-चांदी, रीअल इस्टेट वरच जाईल, असे नाही.

शेअर बाजार अस्थिर असण्याची कारणे :

१) **कंपन्यांची कमकुवत कामगिरी :** मागील दीड वर्षातील तिमाही निकाल पाहिले, तर बहुतेक कंपन्यांची कामगिरी फारशी चांगली राहिली नाही. मिळकत कमी झाली, नफा कमी झाला.

२) **अमेरिकी टेरिफचा परिणाम :** अमेरिकेने भारतामधील अनेक वस्तूंवर टेरिफ अर्थात आयातशुल्क वाढविल्याने आपल्या कंपन्यांवर परिणाम झाला आणि विशेषतः बाजार भावनांवर (मार्केट सेंटिमेंट्स) परिणाम झाला.

३) **जागतिक तुलनेत कमी परतावा :** जगामधील सर्व शेअर बाजारांची तुलना केली तर मागील दीड वर्षात भारतीय शेअर बाजाराने सर्वांत कमी परतावा दिलेला दिसतो.

४) **परकी गुंतवणूकदारांची सतत विक्री :** 'एफआयआय'ने मोठ्या प्रमाणावर विक्री करून आपली गुंतवणूक इतर देशांमध्ये वळवली.

५) **पर्यायी मालमत्ता चमकल्या :** सोने, चांदी, रीअल इस्टेट, क्रिप्टो करन्सी यांनी चांगला परतावा दिल्यामुळे अनेक गुंतवणूकदार शेअर बाजाराकडून या मालमत्ता विभागांकडे वळले.

सोहम : इथपर्यंत लक्षात आले, परंतु पुढे काय?

मी : हो, तिकडेच येतो. सप्टेंबरपर्यंत बाजाराने खराब कामगिरी केली हे खरे आहे; परंतु त्यानंतर बाजार सुधारत गेला आणि गेल्याच महिन्याच्या अखेरीस बाजाराने आधीचा उच्चांकसुद्धा पार केला. येणारा पुढील काळ शेअर बाजार वर जाण्याची चिन्हे दाखवत आहे. मी असे का म्हणतोय... तर ऐक...

येणारा काळ कसा असेल?

शेअर बाजाराला वर नेणारी १० सकारात्मक कारणे -

१) **कंपन्यांची सुधारणारी कामगिरी :** सप्टेंबर तिमाहीमध्ये बहुतेक कंपन्यांचे निकाल चांगले आले. साधारणपणे १५.५० टक्के मिळकतवाढ दिसली, जी समाधानकारक आहे. तसेच डिसेंबरमधील कामगिरीसुद्धा अशीच किंवा यापेक्षा चांगली होण्याची लक्षणे आहेत. कंपन्यांकडे 'कॅश' वाढली असून, कर्जाचे प्रमाण कमी झाले आहे.

२) **अमेरिकी टेरिफ-चांगली बाजू :** अमेरिकी टेरिफने आपल्याला अरेच काही शिकविले. या परिस्थितीने भारताने एक धडा शिकला, कोणत्याही एका देशावर अवलंबून राहू नये. 'आत्मनिर्भर भारत' ही संकल्पना रूजायला मदत झाली. युरोप, चीन, रशिया, आखाती देशांबरोबर काही चांगले करार झाले. आपल्या देशामध्येसुद्धा आपण चांगली कामगिरी करू शकतो, हे लक्षात आले. आपल्यालाच आपली चांगली बाजू दिसली. आयात न करता देशांतर्गत उत्पादन वाढविले पाहिजे, हे परत एकदा लक्षात आले. आपल्या देशातील हुशार आणि बुद्धिमान मुले परत भारताकडे यायला निघाली. या सर्वांमुळे, असे वाटते, की अमेरिकेने वाढविलेले आयातशुल्क हा मुद्दा बाजारासाठी आता तितका महत्त्वाचा राहिलेला नाही.

३) **सोने-चांदीतील घसरण आणि निधी परत इक्विटीकडे** : सोने आणि चांदी यांनी सप्टेंबरपर्यंत जो मोठा परतावा दिला होता, त्यामध्ये आता घसरण दिसू लागली आहे. यामुळे अनेकांनी सोने आणि चांदी यांमधून परत शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडांकडे यायला सुरुवात केली आहे.

४) **परकी संस्थात्मक गुंतवणूकदार (एफआयआय) पुन्हा खरेदीच्या मोडमध्ये** : 'एफआयआय' अर्थात परकी संस्थात्मक गुंतवणूकदार आपल्या शेअर बाजाराकडे परत यायला लागले आहेत. ऑक्टोबरपासून त्यांची विक्री कमी झाली असून, खरेदी वाढू लागली आहे.

५) **भारतीय बाजार स्वस्त आणि आकर्षक** : शेअर बाजार, जो महाग झाला होता, तो मागील ६ ते ८ महिन्यांच्या घसरणीनंतर बऱ्यापैकी स्वस्त झाला आहे. अजूनही जीडीपी ते मार्केट कॅप हे गुणोत्तर १३२ असले तरीही ते इतर देशांच्या तुलनेत स्वस्त झाले आहे. अमेरिकेचे हेच मूल्य २२४ आहे.

६) **सरकारची आक्रमक धोरणे** : प्राप्तिकरामध्ये सवलत, 'जीएसटी'मध्ये सवलत, आठवा वेतन आयोग, लाडकी बहीण यांसारख्या योजना आदींमुळे लोकांच्या हातात पैसा खुळखुळू लागला आहे, ज्यामुळे चप्पल-बुटांपासून ते गॅजेट, टीव्ही, स्कूटर, चारचाकी गाड्यांपर्यंत अनेक वस्तूंची विक्री वाढली. दिवाळीमध्ये एका आठवड्यात सहा लाख कोटी रुपयांची उलाढाल झाली, हा ऐतिहासिक आकडा आहे आणि मागील तीन वर्षांची परकी संस्थात्मक गुंतवणूकदारांची विक्री आहे.

७) **देशातील गुंतवणूकदारांचा दृढ विश्वास** : या सर्व काळामध्ये देशातील गुंतवणूकदारांनी मात्र त्यांचा विश्वास देशाच्या अर्थव्यवस्थेवर दृढ ठेवला. मागील १० वर्षांत डी-मॅट खात्यांची संख्या १.२ कोटींवरून १२ कोटी झाली आणि त्यातील साधारण ४ कोटी खाती ही मागील एका वर्षात उघडली गेली. यातील ८० टक्के खातेधारक हे ४० वर्षांच्या खालील आहेत. तसेच, फक्त म्युच्युअल फंड 'एसआयपी'मधून महिन्याला ३०,००० कोटी रुपये भांडवली बाजारात येतात आणि हा खूप मोठा आकडा आहे. या सर्व गोष्टी हेच दर्शवितात, की देशातील आणि विशेषतः छोट्या गुंतवणूकदारांचा आपल्या भांडवली बाजारावर म्हणजेच शेअर बाजारावर, म्युच्युअल फंडांवर दृढ विश्वास आहे.

८) **'एआय बबल'चा भारतावर कमी परिणाम** : असे म्हणतात, की अमेरिकेतील 'मॅग्निफिसंट ७ शेअर्स', जे 'एआय' संबंधित आहेत, त्यांचे मूल्यांकन हा मोठा फुगा असून, तो फुगा लवकरच फुटणार आहे. तसे झाले, तर अमेरिकी शेअर बाजार घसरेल आणि त्याचा इतर देशातील बाजारांवर परिणाम होईल. परंतु, भारतामध्ये 'एआय'संबंधी विशेष काम नाही आणि त्यामुळे असे 'एआय' संबंधीचे शेअर किंवा कंपन्या फारशा नसल्यामुळे आपल्या बाजारावर त्याचा विशेष परिणाम दिसणार नाही.

९) **एमएससीआय प्रीमियम आकर्षक स्तरावर (मॉर्गन स्टॅन्ले कॅपिटल इंटरनॅशनल इंडेक्स)** : मध्यंतरी भारताचे मूल्यांकन वाढल्यामुळे आपला प्रीमियम वाढून १६३ पर्यंत गेला होता, जो आता अधिक आकर्षक पातळीवर म्हणजे ५५ वर आला आहे; ज्यामुळे उदयोन्मुख बाजारांमध्ये भारताचे आकर्षण वाढले.

१०) **आगामी अर्थसंकल्पाकडून मोठी अपेक्षा** : शेवटचे, पण महत्त्वाचे कारण म्हणजे आगामी अर्थसंकल्प. माझ्या मते, हा अर्थसंकल्प बाजारासाठी अतिशय उत्तम असणार आहे. सरकार गुंतवणुकीच्या संबंधी बहुतेक चांगल्या गोष्टी आणि बदल करेल, असे वाटते. 'एसटीटी' कमी झाला तरी आश्चर्य वाटणार नाही; ज्यामुळे बाजाराला खूप मोठी उभारी मिळेल. रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) शेअर बाजारामध्ये गुंतवणूक करण्यासाठीच्या कर्जाची मर्यादा नुकतीच वाढवून एक कोटी रुपये केली आहे.

गुंतवणुकीत शहाणपण हवे, घाई नाही!

सोहम आणि अथर्व, शेवटी मी तुम्हा दोघांना एकच सांगेन, की ज्ञान, कौशल्य, पुरेसा वेळ आणि योग्य मालमत्ता विभाजन नसल्यास थेट शेअर निवडणे धोकादायक ठरू शकते. शेअर निवडणे म्हणजे कौशल्य, वेळ, संशोधन आणि पुरेसे भांडवल या चौघांची गरज असते. शेअर निवडताना अनेक गोष्टी तपासाव्या लागतात, ते ज्ञान आणि कौशल्य तुमच्याकडे आहे का?, असेलच तर तुम्हाला वेळ आहे का? वेळ असला तर तुमच्याकडे पुरेसे पैसे आहेत का, ज्याने तुम्ही २०० ते २५० शेअर घेऊ शकता? तसे नसेल तर, चांगल्या म्युच्युअल फंडांच्या चांगल्या इक्विटी योजनांमध्ये 'एसआयपी' करा आणि निर्धास्त राहा; ज्यामुळे बाजार खाली आहे, का वर ते रोज पाहायला लागणार नाही, तणाव येणार नाही, नोकरी-व्यवसायावर फोकस राहील. दररोज बाजार वर-खाली का होत आहे, हे पाहण्यात वेळ घालवण्यापेक्षा शेअर बाजाराला त्याचे काम करू द्या, तो दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी नेहमी उत्तमच काम करतो.

(**डिस्क्लेमर** : शेअर बाजारातील गुंतवणुकीत जोखीम असते. त्यामुळे वाचकांनी गुंतवणुकीबाबतचे निर्णय अनुभवी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली घेणे हिताचे ठरते.)

(लेखक एअेस फायनान्शिअल सोल्युशन्सचे प्रवर्तक आणि ज्येष्ठ गुंतवणूक सल्लागार आहेत.
९८२३६६६९१३)